MHWR030004272016

दाखल दिनांक :१९/०१/२०१६
नोंदणी दिनांक :१९/०१/२०१६
निकाल दिनांक :१८/०७/२०२६
कालावधी :१० व. ०६ म. ०२ दि.

## ‘‘भाग अ’’

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : विक्रांत प्र. खंदारे)
(निकाल घोषित दिनांक १८/०७/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र. ३३/२०१६**

पोलीस स्टेशन वर्धा शहर, पहिली खबर क्र. २४९/२०१५

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी<br>वर्धा शहर पोलीस स्टेशन, जि. वर्धा. |
| सरकार तर्फे विधीज्ञ | | श्री. ए. एस. पठाण, श्रीमती जे. एन. काळे. |
| आरोपी | | अमोल मधुकरराव जवळेकर,<br>वय : २७ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. आकरे ले आउट, सिंदी मेघे, ता. जि. वर्धा. |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | | श्री. डी. एस. कोल्हे (through L.A.D.C.S.) |

## ‘‘भाग ब’’

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | दिनांक ०८/०६/२०१५ |
| प्रथम खबरी अहवाल नोंदविल्याची तारीख | दिनांक १०/०६/२०१५ |
| दोषारोप/अर्ज/तक्रार दाखल तारीख | दिनांक १९/०१/२०१६ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | दिनांक ०५/०८/२०१९ |
| पुरावा प्रारंभ होण्याची तारीख | दिनांक २३/०३/२०२१ |
| न्यायनिर्णयास राखून ठेवण्याची तारीख | दिनांक १८/०७/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल | दिनांक १८/०७/२०२६ |

आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमिनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | दोषी किंवा निर्दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.कलम ४२८ नुसार खटल्याचे दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अमोल मधुकर जवळेकर | १०/०६/२०१५ | ११/०६/२०१५ | भा.दं.वि. चे कलम ४५२, ५०४ व ५०६ | निर्दोष मुक्त. | नाही. | ०० |

## ‘‘भाग क’’

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१ | देवराव वामनराव इंगोले | १० | घटनास्थळ पंच |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे निशानी ची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | ११ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

ड) मुददेमालाचे वर्णन

| क्रमांक | मुददेमाल / अर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक १८/०७/२०२६ )

प्रस्तुत प्रकरणात आरोपी भारतीय दंड विधाना (थोडक्यात भा.दं.वि.) चे कलम ४५२, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयांच्या आरोपाखालील खटल्यास सामोरे जात आहे.

अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात येणे प्रमाणे :

२. दिनांक ०८/०६/२०१५ रोजी दुपारी ०१:३० वाजताच्या सुमारास मौजा सिंदी मेघे, ता. जि. वर्धा येथे फिर्यादी तिचे पतीसह घरी हजर असतांना आरोपीने अनाधिकृतपणे तिचे घरात घुसून तिला अंडे मागितले. त्यावेळी फिर्यादीने

आरोपीला *'जुने उधारीचे असलेले पैसे पहिले दे, नंतर तुला अंडे देते'* असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीचे घरात ठेवून असलेल्या अंडयाच्या ट्रे मधील अंडे स्वत:चे हाताने घेवून अंडयाचे पैसे न देता घराबाहेर निघून गेला. त्यावेळी फिर्यादीने आरोपीला अंडयाचे पैसे मागितले तेव्हा त्याने तिला शिवीगाळ करून तिचा हात पिरगाळला आणि तिला जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने वर्धा शहर पोलीस स्टेशन, जिल्हा वर्धा येथे आरोपीविरुध्द तक्रार दिली.

३. सदर फिर्यादीनुसार आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन वर्धा शहर, जि. वर्धा येथे भा.दं.वि. चे कलम ४५२, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा क्र. २४९/२०१५ नोंदविण्यात आला. तपासाअंती पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, वर्धा शहर यांनी आरोपीविरूध्द सदर गुन्हयांकरिता न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. न्यायालयात दोषारोपपत्र सादर झाल्यानंतर दि. ०५/०८/२०१९ रोजी आरोपीविरूध्द नि. क्र. ०५ वर भा. दं. वि. चे कलम ४५२, ५०४ व ५०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीचे प्रतिकथन नि.क्र. ०६ वर स्वतंत्र नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्याने त्याला सदर गुन्हे कबुल नसल्याचे सांगुन संपरिक्षेची तयारी दर्शविली.

<u>अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा गोषवारा</u> :

५. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरूध्दचे दोष सिध्द करण्याकरीता केवळ एका साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली. अभिलेखावर *घटनास्थळ पंच* – सा.क्र. १ देवराव वामनराव इंगोले याची साक्ष नि.क्र. १० वर नोंदविण्यात आली, परंतू सदर साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन दिले नाही. तसेच वारंवार समन्स काढून सुध्दा अभियोगपक्ष फिर्यादी व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यास अपयशी ठरला. त्यामुळे अभियोगपक्षाने आपला पुरावा बंद केला.

६. तसेच अभिलेखावर आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून न आल्याने नि.क्र. ०१ वरील दि. १०/०७/२०२६ रोजीचे आदेशान्वये आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वयेचे बयाण विसर्जित करण्यात आले.

७. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचा उहापोह केला. तसेच विद्वान सहायक सरकारी वकिल व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तिवाद ऐकला. त्या अनुषंगाने माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत. त्या मुद्यांवरील कारणमिमांसा व निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | **विचाराधीन मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०८/०६/२०१५ रोजी दुपारी ०१:३० वाजताच्या सुमारास मौजा सिंदी मेघे, ता. जि. वर्धा येथे आरोपीने फिर्यादीच्या घरात गुन्हा करण्याचे उद्‌देशाने अनाधिकृतपणे प्रवेश करून गृहअतिक्रमण केले ? | ... होय. |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद वेळी, स्थळी व दिवशी आरोपीने सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्‌देशाने प्रवृत्त करून फिर्यादीला शिवीगाळ केली ? | ... नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद वेळी, स्थळी व दिवशी आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देवून फौजदारी धाकदपटशा केला ? | ... नाही. |
| ४. | अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द कोणता गुन्हा सिध्द केला काय ? | ... नाही |
| ५. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमीमांसा व निष्कर्ष

### मुद्दे क्र. १ ते ४ च्या संदर्भात :

८. मुद्दे क्र. १ ते ४ हे आपसात निगडीत असल्याने घटनेची व पुराव्याची पुनर्रावृत्ती टाळण्याकरीता त्यांची कारणमिमांसा एकत्रित देण्यात येत आहे.

९. भा. दं. वि. चे कलम ४५२, ५०४ व ५०६ अन्वये अभियोगपक्षाला हे सिध्द करावे लागेल की, आरोपीने फिर्यादीच्या घरात गुन्हा करण्याचे उद्‌देशाने अनाधिकृतपणे प्रवेश करून सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्‌देशाने तिला प्रवृत्त करून शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारी धाकदपटशा केला. अभियोगपक्षातर्फे सदर दोष सिध्द करण्याकरीता केवळ एका साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

१०. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा उहापोह केला. तसेच विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान

वकिल यांचा युक्तिवाद ऐकला.

११. अभियोगपक्षाचा सा.क्र. १ देवराव हा प्रकरणातील घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, दि. ११/०६/२०२१५ रोजी पोलिसांनी त्याला कोणत्याही पंचनाम्याकरीता बोलविले नव्हते आणि त्याचेसमक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता. त्याने नि.क्र. ११ वरील पंचनाम्यावरील त्याची सही ओळखून त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयाणाचे विसंगत साक्ष देत असल्याने विद्वान सहाय्यक सरकारी वकिलांनी त्यास उत्तरसुचक प्रश्ने विचारली असता त्याने अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन दिले नाही.

१२. वर नमुद केल्याप्रमाणे अभियोगपक्ष फिर्यादी व इतर साक्षीदारांची साक्ष उपलब्ध करून नोंदविण्यास अपयशी ठरला. त्यामुळे घटनेच्या वेळी आरोपीने गुन्हा करण्याचे उद्‌देशाने फिर्यादीचे घरामध्ये प्रवेश केल्याचे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच आरोपीने फिर्यादीला नेमकी कोणती शिवीगाळ केली आणि काय धमकी दिली याबाबत सुध्दा अभिलेखावर पुरावा नाही. अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरून आरोपीची घटनास्थळावरील उपस्थिती सिध्द होत नाही. तसेच त्याने फिर्यादीचे घरामध्ये अवैधरित्या प्रवेश करून तिला अश्लील शिवीगाळ केल्याचे अथवा दमदाटी केल्याचे दर्शविणारा सुध्दा पुरावा नाही.

१३. अश्या परिस्थितीत अभियोगपक्षाचे कथनास दुजोरा मिळत नाही. तसेच त्यावरून आरोपीने गुन्हा करण्याचे उद्‌देशाने फिर्यादीच्या घरात अनाधिकृतपणे प्रवेश केल्याचे, सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्‌देशाने प्रवृत्त करून तिला शिवीगाळ केल्याचे आणि जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारी धाकदपटशा केल्याचे निष्पन्न होत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द भा. दं. वि. चे कलम ४५२, ५०४ व ५०६ अन्वयेचे गुन्हे आकर्षित होत नाहीत.

१४. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा त्रोटक स्वरुपाचा असुन अभियोगपक्ष आरोपीविरूध्द सबळ पुरावा सादर करण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे आरोपीविरूध्द कोणतेही गुन्हे सिध्द होत नाहीत. करीता मी मुद्दे क्रमांक १ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात</u> :**

१५. वर नमूद कारणे व निष्कर्षांच्या अनुषंगाने आरोपीविरुध्द कोणताही

गुन्हा सिध्द न झाल्याने तो निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करिता मी मुद्दा क्र. ५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी अमोल मधुकरराव जवळेकर यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ५०४ व ५०६ अन्वयेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जुना जामीनकदबा रदद करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७—अ च्या अनुपालनाकरीता प्रत्येकी रुपये १०,०००/— चे वैयक्तीक बंधपत्र व जमानत सादर करावी. सदर जामिन पुढील ६ महिन्यांकरीता अस्तित्वात राहिल व त्यानंतर तो रद्द समजण्यात यावा.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व अधिघोषित करण्यात आला. )

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.07.18 15:56:39 +0530

दिनांक : १८/०७/२०२६
ठिकाण : वर्धा

( विक्रांत प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**<u>प्रमाणपत्र</u>**

या पी. डी. एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जितेंद्र हि. जावळे, |
| कोर्टाचे नाव | : | श्री. वि. प्र. खंदारे,<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.<br>(फौजदारी न्यायालय क्र. १) |
| पीठासीन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख | : | १८/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड करण्यात आल्याची तारीख | : | १८/०७/२०२६ |

स्वा/—

दिनांक : १८/०७/२०२६ (जि. हि. जावळे)

ठिकाण : वर्धा लघुलेखक ग्रेड ३

प्रथमवर्ग न्यायालय क्र. १, वर्धा